सत्यमेव जयते
महाराष्ट्र शासन
पोलीस अधीक्षक, लोहमार्ग पुणे कार्यालय
जुने सी.आय.डी. ऑफीस, संगम ब्रिज जवळ, शिवाजी नगर, पुणे ४११००५

**प्रेस नोट** दिनांक २७/१२/२०२४

**३८ वी लोहमार्ग परिक्षेत्रीय क्रिडा स्पर्धेचे दिनांक २७/१२/२०२४ रोजी राज्य राखीव पोलीस बल गट नं.१, रामटेकडी, हडपसर, पुणे येथे सांगता झालेबाबत.**

३८ वी लोहमार्ग परिक्षेत्रीय क्रिडा स्पर्धा हि दिनांक २३/१२/२०२४ ते दिनांक २७/१२/२०२४ या कालावधीत राज्य राखीव पोलीस बल गट नं.२, रामटेकडी, पुणे येथे पार पडल्या असुन लोहमार्ग परिक्षेत्रामधील लोहमार्ग मुंबई आयुक्तालय, लोहमार्ग पुणे, लोहमार्ग औरंगाबाद व लोहमार्ग नागपूर या लोहमार्ग पोलीस आयुक्तालय व जिल्हयांचा समावेश असुन एकुण ११ क्रिडा प्रकारामध्ये ३७५ पोलीस अंमलदार यांनी भाग घेतला होता.

दिनांक २७/१२/२०२४ रोजी संध्याकाळी १६:०० वा. मा. श्री. प्रविण साळुंके (भा.पो.से.),अपर पोलीस महासंचालक, लोहमार्ग, महाराष्ट्र राज्य, मुंबई व मा.श्री. डॉ. रविंद्र शिसवे (भा.पो.से.), पोलीस आयुक्त, मुंबई लोहमार्ग यांनी ३८ वी लोहमार्ग परिक्षेत्रीय क्रिडा स्पर्धा, राज्य राखीव पोलीस बल गट नं.१, रामटेकडी, हडपसर, पुणे येथे भेट दिली. सदर लोहमार्ग परिक्षेत्रीय क्रिडा स्पर्धांमध्ये सर्वोत्तम खेळाडू पुरस्कार (पुरुष) सोहम पाटील, मुंबई लोहमार्ग तसेच सर्वोत्कृष्ट खेळाडू पुरस्कार (महिला) पूनम चित्रकाटे, पुणे लोहमार्ग यांना मिळाला आहे. तसेच जनरल चॅम्पियनशीप पुरस्कार मुंबई लोहमार्ग यांनी पटकविला आहे. सदर क्रीडा स्पर्धांची सांगता करण्यात आली आहे.

तरी सदरची बातमी आपल्या वृत्तपत्रात प्रसारीत करण्यास नम्र विनंती आहे.

सस्नेह !

Scanned with OKEN Scanner